**MHNS240002512026**

| | |
|---|---|
| दाखल तारीख | : १०/०२/२०२६ |
| नोंदणी तारीख | : १०/०२/२०२६ |
| निकाल तारीख | : ०८/०४/२०२६ |
| कालावधी | : वर्षे महिने दिवस<br>०० ०१ २९ |
| निशाणी | **०७ लगत** |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सटाणा, जि.नाशिक यांच्या न्यायालयात

(पिठासीन अधिकारी सी.यु.शिपकुले)

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र.५९/२०२६**

प्रथम खबर क्र.६१०/२०२५, पोलीस ठाणे सटाणा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष/फिर्यादी | महाराष्ट्र सरकार तर्फे पोलिस ठाणे सटाणा ता. सटाणा, जि.नाशिक. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. एस.आर. गायकवाड. |
| आरोपी | **०१. दादाजी काळु आहिरे,** वय–४९ वर्ष,<br>**०२. रामसिंग काळु आहिरे**, वय–५० वर्षे,<br>दोन्ही रा. केरसाणे, ता. सटाणा, जि. नाशिक. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. वाय. एच. पाटील |
| घटना तारीख | ११/०९/२०२५ |
| प्रथम खबर तारीख | ११/०९/२०२५ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | १०/०२/२०२६ |
| आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | १०/०२/२०२६ |
| पुरावा चालु तारीख | १०/०३/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | ०८/०४/२०२६ |

## आरोपीची सविस्तर माहिती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोप निश्चित केलेले कलम | निर्दोष मुक्ता केले का दोषारोप सिध्द झाले | शिक्षा | शिक्षेची वजावट झालेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दादाजी काळु आहिरे | अटक नाही | १०/०२/२०२६ | भा.न्या.सं.कलम १९४(२) अन्वये तसेच कलम ११२/११७ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये | सिध्द दोषी | द्रव्यदंड | नाही |
| ०२ | रामसिंग काळु आहिरे | अटक नाही | १०/०२/२०२६ | वरीलप्रमाणे | सिध्द दोषी | द्रव्यदंड | नाही |

### अ– अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| सा.क्र. ०१ | योगेश शंकरराव पवार | फिर्यादी |
| सा.क्र. ०२ | उमेश अशोक भदाणे | तपासीअधिकारी |
| सा.क्र. ०३ | बाळासाहेब रमेश निरभवणे | साक्षीदार |

### अ– आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

### अ– न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

## अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र

अ. अभियोगपक्षातर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ०८ | फिर्याद |

आरोपीतर्फे

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही. | नाही. |

न्यायालयातर्फे –

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०८/०४/२०२६ रोजी घोषीत)

प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १९४(२) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

फिर्यादी पोलीस हवालदार श्री. योगेश शंकरराव पवार हे दिनांक ११/०९/२०२५ रोजी दुपारी १३.०० वाजताच्या सुमारास सटाणा पोलीस ठाणे येथील पोलीस अंमलदार पो.हवा./९९८ श्री. भदाणे, पो.हवा. श्री. नरभवणे, पो.हवा./श्री. जाधव, पो.कॉ. चव्हाण असे देव मामलेदार कक्षात गुन्हे निर्गतीचे काम करत होते. सदर वेळी त्यांच्याकडे चौकशीकरिता असलेला स्थानिक अर्ज क्र.४५/२०२५ मधील अर्जदार नामे बायजाबाई काळु आहिरे व अर्जातील सामनेवाला नामे दादाजी काळु आहिरे व रामसिंग काळु आहिरे हे सटाणा पोलीस ठाणे येथे हजर केले होते. त्यावेळी आरोपींनी रुमच्या बाहेर एकमेकांना मोठमोठ्याने शिवीगाळ व झोंबाझोंबी करुन सार्वजनिक शांततेचा भंग केला. म्हणुन त्यांनी आरोपींच्या विरुध्द फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादीवरुन सटाणा पोलीस

ठाणे येथे गु.र. क्र.६१०/२०२५ अन्वये भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १९४ (२) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वये आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हया चा तपास पो.हा./९९८ श्री. उमेश ए. भदाणे यांनी करून आरोपींच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०२.** आरोपी हे जामीनावर मुक्त आहे. मी, आरोपींविरूध्द नि.क्र.०७ कडे भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १९४(२) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयाबाबत आरोपींचे प्रतिकथन नोंदविले. त्यातील मजकूर आरोपींना मराठीमध्ये वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करून त्याने संपरिक्षेची मागणी केल्यावरून त्याच्याविरूध्द खटला चालविण्यात आला.

**०३.** अभियोगपक्षाने आरोपींविरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी पो.हवा./१९३७ श्री. योगेश शंकरराव पवार यांना सा.क्र.१, तपासिक अधिकारी श्री. उमेश अशोक भदाणे यांना सा.क्र.०२ तसेच साक्षीदार बाळासाहेब रमेश निरभवणे यांना सा.क्र.०३ म्हणून नि.क्र.०७ लगत तपासले व नि.क्र.१० वरील पुरसिसीव्दारे अभियोगपक्षाने आपला पुरावा बंद केला आहे. नि.क्र.०७ लगत आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम ३५१ अन्वयेचे निवेदन नोंदविण्यात आले. केवळ नकार हाच आरोपींचा बचाव आहे. आरोपींनी त्यांच्या बचावार्थ कोणताही पुरावा दिला नाही व साक्षीदार देखील तपासला नाही.

**०४.** एकंदरीत खालील विचारार्थ बाबी माझ्यासमोर निर्माण होतात. त्यावरील माझे निष्कर्ष त्यासाठी प्रस्तुत कारणमिमांसेच्या आधारे मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | आरोपींनी दिनांक ११/०९/२०२५ रोजी १३.०० वा. चे सुमारास सटाणा पोलीस ठाण्याचे देव मामलेदार कक्ष या सार्वजनिक ठिकाणी मारामारी करुन सार्वजनिक शांतता भंग करुन भारतीय न्याय संहिता कलम ११९(२) अन्वये अपराध केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी.** |

| | | |
|---|---|---|
| २ | आरोपींनी उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी मोठ्या मोठ्याने आरडाओरडा करुन सार्वजनिक परिसरात शांतता भंग करुन मुंबई पोलीस कायदा कलम ११२ चे उलंघ्घन करुन कलम ११७ अन्वये दंडनिय अपराध केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | **होकारार्थी** |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

**<u>विचारार्थ बाब क्रमांक १ करिता:-</u>**

**०५.** श्री. योगेश शंकरराव पवार (अ.सा.१) यांनी त्यांच्या जबाबात सांगीतले आहे की, जुलै २०२३ पासुन ते सटाणा पोलीस ठाणे येथे कार्यरत आहेत. दि.१०/०९/२०२५ रोजी कर्तव्यावर असतांना महिला नामे बायजाबाई काळु आहिरे यांनी आरोपींविरुध्द पोलीस ठाणे येथे स्थानिक तक्रारी अर्ज क्र.४५/२०२५ नुसार अर्ज दिला होता. सदर आरोपी व अर्जदार महिला यांना सटाणा पोलीस ठाणे पोलीस उप-निरिक्षक यांच्यासमोर उपस्थित केले होते. सदर अर्जदार महिला हिने पोलीस उपनिरिक्षक यांना तिच्या तक्रारीबाबत माहिती सांगतली. त्यानुसार ते तक्रारदार महिलेचा जबाब नोंदवत असतांना आरोपींना पोलीस ठाण्याच्या आवारात थांबवले होते. ते जबाब नोंदवत असतांना आरोपींच्या मध्ये पोलीस ठाण्याच्या आवारातच मारामारी, शिवीगाळ व भांडण सुरु झाली. सदर भांडणामुळे खुप गोंधळ झाला. त्यांच्यासोबत त्यावेळी तत्कालीन ठाणे अंमलदार, पो.ह. भदाणे, निरभवणे, पो.ह. जाधव व कॉस्टेबल चव्हाण हे कर्मचारी देखिल हजर होते. त्यानंतर त्यांनी भांडण सोडवले. त्यानंतर त्यांनी आरोपींच्या विरुध्द शासनाच्या वतीने फिर्याद दाखल केली. उलटतपासात, त्यांनी साक्षीदार हे पोलीस साक्षीदार असल्याचे कबुल करुन इतर सुचक प्रश्न नाकारलेले आहेत.

**०६.** तपासी अधिकारी उमेश भदाणे सा.क्र.०२ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये कथन केले की, सन २०२३ पासुन ते सटाणा पोलीस ठाणे येथे कार्यरत असुन पोलीस ठाणे मध्ये

दाखल गु.र.क्र.६१०/२०२५ चा तपास लेखी आदेशाने त्यांच्याकडे वर्ग झाल्यावर त्यांनी तपासकामी साक्षीदारांची तपासटिपणे नोंदवुन तपासाअंती आरोपींनी पोलीस ठाण्याच्या आवारात मारामारी करुन गोंधळ केला होता असे निष्पन्न झाल्याने आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

**०७.** साक्षीदार बाळासाहेब रमेश निभवणे सा.क्र.०३ यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये कथन केले की, सटाणा पोलीस ठाणे येथे दि.११/०९/२०२५ रोजी ते, पो.ह. भदाणे, पो.ह. जाधव व कॉस्टेबल चव्हाण असे कर्तव्यावर हजर असतांना तक्रारी अर्ज चौकशीकामी आरोपींना पोलीस ठाण्यामध्ये बोलवले होते. आरोपींमध्ये त्यांच्या समोर पोलीस ठाण्याच्या आवारातच मारामारी, शिवीगाळ झाल्याने योगेश पवार यांनी आरोपींच्या विरुध्द फिर्याद दिली होती. सदर भांडणे त्यांनी व इतर पोलीस कर्मचा–यांनी सोडवली होती. सदर साक्षीदाराने उलटतपासात विचारलेल्या सर्व प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिलेली आहेत.

**०८.** आरोपीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, श्री. योगेश पवार (अ.सा.१), उमेश भदाणे (अ.सा.२) व बाळासाहेब निरभवणे (अ.सा.०३) हे पोलीस कर्मचारी असल्याने त्यांचा पुरावा ग्राह्य धरता येणार नाही. तीनही साक्षीदार केवळ पोलीस कर्मचारी असल्याने त्यांच्या मौखीक पुराव्याच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत नाही व तसे कारणही नाही. सदर गुन्हा हा पोलीस ठाण्याच्या आवारात घडला असल्याने साक्षीदार पोलीस आहेत या कारणावरुन त्यांची साक्ष नाकारता येणार नाही. सदर घटना हि सार्वजनिक ठिकाणी घडलेली आहे. घटनास्थळाबाबत बचाव पक्षातर्फे कोणतेही प्रश्नचिन्ह निर्माण केलेले नाहीत. त्यामुळे बचावपक्षाने त्यांच्या बाजुने उपयुक्त असेल अशी कोणतीच बाब अभिलेखावर आणली नाही असे दिसुन येत आहे. सबब, सादर पुराव्यावरुन आरोपींचा अपराध निर्विवादपणे सिद्ध झालेला आहे. अभियोगपक्षाने आरोपींवर ठेवण्यात आलेला आरोप पुरेशा पुराव्यानिशीच नव्हे तर वाजवी शंकेच्या पलीकडे सिध्द केला आहे. त्यामुळे

आरोपींविरुध्द लादण्यात आलेला गुन्हा सिध्द होतो व आरोपींना भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम १९४(२) व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्ह्यासाठी दोषी धरण्यात येत आहे. या ठिकाणी सदर गुन्ह्यासाठी नमूद केलेल्या शिक्षेबाबत बचावपक्षाची बाजू ऐकण्यासाठी मी थांबत आहे.

SHIPKULE CHARUDATTA Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA Date: 2026.04.08 16:17:30 +0530

**स्थळ : सटाणा.** **(चारुदत्त उध्दव शिपकुले)**
**दिनांक : ०८/०४/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा.**

**०९.** बचाव पक्षाच्या वतीने विधिज्ञ श्री. वाय.एच. पाटील तसेच स्वतः आरोपी यांनी निवेदन केले की, गुन्ह्यासाठी असणारी शिक्षा हि गुन्हयाच्या तुलनेत अत्यंत तिव्र आहे. आरोपी यांची गुन्हेगारी पार्श्वभुमी नाही. आरोपी हे गरिब असुन साधारण शेती व्यवसायावर ते त्यांच्या परिवाराचे उदनिर्वाह करतात. आरोपींना तुरुंगवासामध्ये ठेवल्यास त्यांच्या परिवाराचे हाल होवुन शेतीचे नुकसान होईल. म्हणुन त्यांनी न्यायाच्या खातिर केवळ कमीत कमी द्रव्यदंडाची शिक्षा करण्याची विनंती केली. विद्वान सरकारी वकिल श्री. एस.आर. गायकवाड यांनी युक्तिवाद केला की, आरोपींना नियमानुसार जास्तीत जास्त शासन करावे. उभयपक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर मी, अशा निष्कर्षाप्रत आलो आहे की, मुळातच आरोपी हे अत्यंत गरिब असल्याचे दिसुन येत आहे. आरोपींनी केलेल्या अपराधाबाबत पश्चाताप होत असल्याचे दिसुन येत आहे. आरोपींनी न्यायालयासमक्ष पुन्हा ते अशाप्रकारे अपराध करणार नसल्याबाबत क्षमायाचना केली आहे. आरोपींची अर्थिक परिस्थिती तसेच गुन्ह्याची तिव्रता विचारात घेता खालीलप्रमाणे आदेश पारित करणे योग्य ठरेल असे मला वाटते. सबब, पुढील आदेश.

## आ दे श

**०१.** आरोपी नामे दादाजी काळु आहिरे व रामसिंग काळु आहिरे यांना भारतीय न्याय संहिता कलम १९४(२) अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयाकरिता भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम २७८ (२) अन्वये दोषी धरण्यात येत आहे

व त्यांना सदर गुन्ह्यासाठी न्यायालय उठेपर्यंत कैदेची शिक्षा तसेच प्रत्येकी रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) दंडाची शिक्षा व द्रव्य दंड न भरल्यास १० दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

**०२.** आरोपी नामे दादाजी काळु आहिरे व रामसिंग काळु आहिरे यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ११२/११७ अन्वयेच्या शिक्षापात्र गुन्हयांतून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम २७८ (२) अन्वये दोषी धरण्यात येत आहे व त्यांना सदर गुन्ह्यासाठी प्रत्येकी रक्कम रुपये ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) दंडाची शिक्षा व द्रव्य दंड न भरल्यास दहा दिवसांच्या साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येत आहे.

**०३.** आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

**०४.** आरोपींनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकामी प्रत्येकी रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र दिलेले आहे.

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.04.08 16:17:19 +0530

**स्थळ : सटाणा.** **(चारुदत्त उध्दव शिपकुले)**

**दिनांक : ०८/०४/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा.**